सन २०२६-२७ करिता गोंदिया जिल्ह्यात मका पिकाचे उत्पादन आणि उत्पादकता वाढवून इथेनॉल निर्मिती प्रकल्प राष्ट्रीय कृषी विकास योजना (RKVY) अंतर्गत राबविण्यास प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषि विभाग
शासन निर्णय क्रमांक: पौतृव-२०२६/प्र.क्र.९१/४ अे(ई-१७४४५७५)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२,
दिनांक : २१ जुलै, २०२६

वाचा :-

१) राज्यस्तरीय मंजुरी समितीच्या बैठकीचे इतिवृत, शा.पत्र जा.क्र.RKV-१२२५/CR२१८/१४ अे, दि.०९.०१ २०२६

२) प्रकल्प मंजुरी समिती (PAC) बैठकीचे इतिवृत्त पत्र क्र. फा.सं १-१५/२०२६-RKVY- १९८, दिनांक २२.०४.२०२६.

३) कृषि आयुक्तालयाचे पत्र जा. क्र. कृआ/ वि प्र.२/राकृवियो/गोंदिया(मका)-प्र.मान्यता/र-२५२, दि.१८.०५.२०२६

प्रस्तावना :-

केंद्र शासनाने पेट्रोल इंधनामध्ये २०% इथेनॉल मिश्रण करण्याचे लक्ष ठेवले आहे. त्यानुषंगाने, सचिव यांचे अध्यक्षतेखाली दि. ०१.०७.२०२१ व ०९.०८.२०२१ रोजीच्या बैठकीद्वारे मका धान्यापासून इथेनॉल निर्मिती करणाऱ्या डिस्टिलरीज पासून ५०-१०० कि.मी. परिसरात उच्च उत्पादन देणाऱ्या चांगल्या प्रतीच्या बियाण्याचा वापर करून मका पीकाच्या लागवडीस प्रोत्साहन देण्याच्या अनुषंगाने, राष्ट्रीय कृषी विकास योजना (RKVY- DPR) अंतर्गत राज्यस्तरीय मान्यता समिती (SLSC) च्या मंजुरीने, विशेष प्रकल्प तयार करण्याच्या अनुषंगाने सूचना प्राप्त झालेल्या होत्या.

गोंदिया जिल्ह्यात मका पिकाचे उत्पादन आणि उत्पादकता वाढवून इथेनॉल निर्मिती वाढविण्यासाठी, राष्ट्रीय कृषी विकास योजना-DPR Based Scheme अंतर्गत, विशेष प्रकल्प, मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखालील दि. ०१.०१.२०२६ रोजीच्या आयोजित ४१ व्या बैठकीमध्ये मंजूर करण्याच्या अनुषंगाने सादर करण्यात आलेला होता. सदर बैठकीमध्ये मका औजारे बँक, पीक प्रात्यक्षिके, शेतीशाळा व शेतकरी प्रशिक्षण व अनुषंगिक आकस्मिक खर्च या बाबींसाठी रु. ३४.०१३९ कोटी रक्कमेचा प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत सूचना दिलेल्या होत्या. राष्ट्रीय कृषी विकास योजनेतंर्गत (RKVY) मका औजारे बँक, पिक प्रात्याक्षिके व अनुषंगिक आकस्मिक खर्च यासाठी प्रकल्प मूल्य रु. २९.६४३० कोटी राहील

व प्रकल्पामधील शेतीशाळा व शेतकरी प्रशिक्षण या बाबी (प्रकल्प मूल्य रु.१.९७०९ कोटी) विस्तार योजनांमधून राबविण्याबाबत मान्यता देण्यात आलेली होती.

सदर प्रकल्प PM-RKVY(DPR) मध्ये ३ वर्ष कालावधीसाठी सादर करण्यात आलेला होता. तथापि, केंद्र शासनाच्या दि.०२.०४.२०२६ रोजीच्या बैठकीमध्ये Project approved under PM-RKVY (DPR) अंतर्गत नवीन प्रकल्पामध्ये, मका शेती औजारे बँक हा घटक, कृषी यांत्रिकीकरण योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार (SMAM norms) व पीक प्रात्याक्षिके हा घटक, राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियानाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार (NFSM norms) राबविण्यात यावा. सदर घटकांसाठी, सन २०२६-२७ या वर्षासाठी (केंद्र+राज्य हिस्सा) मिळून ११२४.०० लाख व त्यावर प्रशासकीय बाबीसाठी २.५% म्हणजेच रु. २८.१० लाख अशा एकूण रु.११५२.१० लाख रक्कमेच्या प्रकल्पास, केंद्र शासनाने, वाचा क्र.२ येथील दि. २२.०४.२०२६ च्या पत्रानुसार मान्यता दिलेली आहे. सन २०२६-२७ करिता, गोंदिया जिल्ह्यात मका पीकाचे उत्पादन आणि उत्पादकता वाढवून, इथेनॉल निर्मितीसाठी, राष्ट्रीय कृषि विकास योजनेतंर्गत (RKVY- DPR) विशेष प्रकल्पास, प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> :-

सन २०२६-२७ करिता गोंदिया जिल्ह्यात मका पिकाचे उत्पादन आणि उत्पादकता वाढवून इथेनॉल निर्मितीसाठी, राष्ट्रीय कृषि विकास योजनेतंर्गत (RKVY- DPR) विशेष प्रकल्पाच्या, रु. ११५२.१० लाखाच्या कार्यक्रमास पुढीलप्रमाणे प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र	बाबी	अनुदानाचा दर	सन २०२६-२७ भौतिक व आर्थिक लक्षांक (रक्कम रु. लाख)					
			राकृवियो प्रकल्प किंमत		लाभार्थी हिस्सा	अंमल बजावणी यंत्रणा	एकूण	
			भौतिक	आर्थिक			भौतिक	आर्थिक
अ	मका शेती औजारे बँक	रु. ३० लाख/मका शेती औजारे बँक (कृषी यांत्रिकीकरण योजनेच्या मार्गदर्शक सूचना-२०२५)	२०	४८०.००	१२०.००	०	२०.००	६००.००
ब	सुधारित तंत्रज्ञानावर आधारित पीक प्रात्यक्षिके	रु.११५००/ हे (राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियानाच्या मार्गदर्शक सूचना-२०२५)	५६००	६४४.००	०.००	०	५६००.००	६४४.००
क	शेती शाळा व शेतकरी प्रशिक्षण	रु. ३२४०० /शेती शाळा रु. ४ लाख/शेतकरी प्रशिक्षण		०.००		६५.७०	११२.००	६५.७०
एकूण				११२४.००	१२०.००	६५.७०		१३०९.७०
आकस्मिक खर्च				२८.१०	०.००	०.००		२८.१०
एकूण				**११५२.१०**	**१२०.००**	**६५.७०**		**१३३७.८०**

२.	वरील बाबीपैकी, शेतीशाळा व शेतकरी प्रशिक्षण या बाबींच्या अंमलबजावणीसाठी सन २०२६-२७ साठी रु.६५.७० लाख निधीचे नियोजन खालीलप्रमाणे कृषी विभागाच्या अन्य योजनांमधून अभिसरणाद्वारे (Convergence) करण्यात यावे.

अ.क्र.	बाबी	सन २०२६-२७ भौतिक व आर्थिक लक्षांक						एकूण
		आत्मा		पिकांवरील कीड रोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्प (cropsap)		राअसुपोअ-भरडधान्य (मका)		
		रु.३२४००/शेती शाळा रु.४ लाख/शेतकरी प्रशिक्षण		रु.१३०००/शेती शाळा		रु.३००००/शेतकरी प्रशिक्षण		
		भौतिक	आर्थिक	भौतिक	आर्थिक	भौतिक	आर्थिक	आर्थिक
१	शेतकरी प्रशिक्षण	८	३२.००	०	०	६५	१९.५०	५१.५०
२	शेती शाळा	४०	१२.९६	१०.००	१.३०			१४.२६
	एकूण	**४८.००**	**४४.९६**	**१०.००**	**१.३०**	**६५**	**१९.५०**	**६५.७६**

३.	सन २०२६ करिता गोंदिया जिल्ह्यात मका पिकाचे उत्पादन आणि उत्पादकता वाढवून इथेनॉल निर्मितीसाठी, राष्ट्रीय कृषि विकास योजनेतंर्गत (RKVY- DPR) विशेष प्रकल्पास, रु. ११५२.०० लाख निधीचे वितरण राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत (RKVY) करण्यात येईल.

४.	शेतकरी प्रशिक्षण व शेतीशाळा या बाबींच्या अभिसरणाद्वारे (Convergence) करण्यात येणाऱ्या भौतिक लक्षांकाची अंमलबजावणी वर दर्शविल्यानुसार संबंधित योजनांमधून उपलब्ध होणाऱ्या निधी मधूनच करण्यात यावी. त्यासाठी राष्ट्रीय कृषि विकास योजनेतंर्गत (RKVY) स्वतंत्र निधी उपलब्ध होणार नाही.

५.	सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाचे www.maharashtr.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेला असून त्याचा संकेतांक २०२६०७२११७४५५९६३४६ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात आलेला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने ,

RUCHITA RANJAN PIMPLE

Digitally signed by RUCHITA RANJAN PIMPLE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=AGRICULTURE AND ADF DEPARTMENT, 2.5.4.20=4D2E14E1B5B622285A319D549438716BC45686280AAC03BEA60829E714C19298, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7E83BB07DDF0C67032F513E6336E3EE49F53DC047998C7012096DD9C8059D5FE, cn=RUCHITA RANJAN PIMPLE
Date: 2026.07.21 17:47:59 +05'30'

(रुचिता पिंपळे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रती :-

१. मा. मंत्री (कृषी) यांचे खाजगी सचिव, मुंबई.
२. मा. राज्यमंत्री (कृषी) यांचे खाजगी सचिव, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव (वित्त) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. सचिव (कृषी), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. आयुक्त (कृषी), कृषी आयुक्तालय महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, अकोला.

८. विभागीय व्यवस्थापक, राष्ट्रीय बीज निगम, पुणे.
९. उपमहाव्यवस्थापक (मार्केटिंग), HIL (India) Limited, IInd Floor, Core-6, SCOPE Complex,7, Lodi Road, New Delhi - 110003,
१०.उपमहाव्यवस्थापक (मार्केटिंग) World Trade Center, Tower-I, 8th Floor,Nauroji Nagar, Safdarjung Enclave,New Delhi- 110029, India
११.संचालक (कृषि व प्रक्रिया व नियोजन), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे.
१२.संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे.
१३.संचालक (आत्मा), कृषी आयुक्तालय महाराष्ट्र राज्य,पुणे.
१४.कार्यासन-१४ अे (राष्ट्रीय कृषि विकास योजना), कृषि व पदुम विभाग मंत्रालय, मुंबई.
१५.निवड नस्ती (४ अे)